निशाणी ५ वरील आदेश

वादींनी दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ३९ नियम १ व २ अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. **वादींचे थोडक्यात कथन असे आहे की,**

मुळ सर्वे नंबर ६३ मौजे सवना ता.महागांव क्षेत्र ६ हे.१४ आर., यातील पोट हिस्सा क्र.६३/१, ६३/१–ब, व ६३/३–अ या मिळकती एकमेकास लागुन असुन त्या वादींना वडीलोपार्जीत कौटूंबिक व्यवस्थेप्रमाणे मालकी हक्काने मिळाल्या आहेत. सदर मिळकतीची वहीती वादी हे करतात. सदर मिळकतीला लागुन पश्चिमेस प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या जमीनी आहेत व त्यांच्या जमीनीचा सर्वे क्र.६४ आहे. वादीच्या सर्वे नंबर ६३ मधुन उत्तर व मध्य भागातुन अनुक्रमे पुसद–महागांव रोड व वेणी धरणाचा मायनर क्र.६ गेलेला आहे. वादी हे त्यांच्या जमीनी त्यांच्या हद्दीत वहीती करीता व त्यांच्या जमिनीतील पश्चीमेकडील भागाची गुरांसाठी चारा पडीत म्हणुन ठेवलेली आहे. प्रतिवादी हे सवना येथील रहिवाशी असुन त्यांच्याकडे बरीच जमीनी आहेत व त्यांचा मोठा जोट आहे व त्यांच्या कडे गुरे ढोरे सुध्दा आहेत. वादी व प्रतिवादी यांच्या जमीनी बागायती आहेत.

३. वादींचे असे कथन आहे की, वादी हे गावातील अल्पसंख्यांक व अल्पभूधारक आहेत. त्यामुळे त्यांना जमीन विक्री करण्यास भाग पाडण्यासाठी प्रतिवादी हे वादीच्या पश्चीम भागामध्ये जबरीने गुरे चारतात व ट्रॅक्टरने धुरा फोड नष्ट करतात व जबरदस्ती पिकाचे नुकसान करतात. या बाबत वादींनी प्रतिवादींना वारंवार पंचामार्फत ब–याचदा समजावुन सांगितले मात्र त्यांनी अरेरावीची उत्तरे दिली. तसेच तुमच्या जमीनीची मोजणी करुन खुणा कायम करा असे सुचविले. त्यामुळे वादीने सन २०१७–१८ मध्ये शासकीय मोजणी करुन त्यांच्या जमीनीच्या खुणा कायम केल्या. मात्र प्रतिवादी यांनी वादींच्या माघारी खुणा उपटुन फेकल्या व पुन्हा त्रास देणे चालु केले. वादींनी पुन्हा पंचा समक्ष प्रतिवादींना समजावुन सांगितले मात्र त्यांनी उडवा–उडवीचे उत्तर देवुन सर्वे नंबर ६३ ची पुन्हा मोजणी करा असे सांगितले त्यामुळे वादीने पुन्हा मोजणी कार्यालयात अर्ज सादर करुन त्यांच्या जमिनीची मोजणी करुन घेतली व हद्दी खुणा कायम करुन घेतल्या. मात्र तरीही प्रतिवादींनी त्रास देणे थांबविले नाही.

४. वादींचे असे कथन आहे की, प्रतिवादींच्या त्रासामुळे त्यांनी मोजणी प्रमाणे त्यांच्या हद्दीत पश्चीम भागात काटेरी कंपाऊंड करण्याची तयारी केली व त्यासाठी सामानाची जुळवाजुळव केली व तार कंपाऊंड साठी खड्डे खोदण्यासाठी दि.१९/०७/२०२० रोजी गेला असता प्रतिवादींनी सदर कामात अडथळा आणला व जीवे मारण्याची धमकी दिली त्यामुळे वादींना प्रस्तुतचा दावा व अर्ज

दाखल करण्यास भाग झाले. म्हणुन वादीने प्रतिवादी यांनी वाद मिळकतीस हरकत अडथळा करू नये असा तात्पुरता मनाई आदेश दाव्याचा निकाल लागे पर्यत द्यावा अशी विनंती केली आहे.

५. प्रतिवादींनी हजर होवून त्यांचे लेखी म्हणणे नि.क्र.२६ वर दाखल केले आहे. प्रतिवादींनी वादग्रस्त मिळकतीचे वर्णन, क्षेत्र नाकारले. मात्र त्यांची जमीन सर्वे नंबर ६४ असल्याचे मान्य केले. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले की, वादींचे शेत सर्वे नंबर ६३ चे पश्चीम दिशेला त्यांची जमीन असुन त्या जमिनी मधुन त्यांना येण्या–जाण्यासाठी १५ फुटाचा रस्ता प्रतिवादींचे शेताच्या पश्चिमेकडून तयार केला आहे व त्याचा ते वापर करतात. वादी क्र.१ हा चिडखोर असुन त्याचे शेत शेजारील लोकांसोबत वाद करतो. प्रतिवादी क्र.१ हा त्यांचे एकत्र कुटुंबाच्या जमीनीची वहिती स्वतः करतो. प्रतिवादी क्र.२ व ३ कधीही शेतामध्ये येत नाहीत. प्रतिवादी क्र. २ हा बाहेरगावी शिक्षण घेतो व प्रतिवादी क्र. ३ ही गृहिणी आहे.

६. प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, प्रतिववादी क्र.१ यांनी वादी क्र.१ यांना माझे शेतातुन येऊ नको असे सांगितल्याने तो प्रतिवादी क्र.१ सोबत वाद करीत होता त्यावेळी वादींनी सन २०१७–१८ मध्ये मो.र.क्र./७२८/ ह.का.नि/२०१७, दि.०९/०३/२०१८ रोजी भुमी अभिलेख कार्यालय, महागांव

यांचे मार्फत त्यांच्या शेताची मोजणी केली. त्यावेळी प्रतिवादी क्र.१ व ईतर पंच हजर होते. मोजणी अधिका–याने सर्वे क्र.६३ ची मोजणी करुन पंचा समक्ष खुणा करुन दिल्या व त्या प्रमाणे प्रतिवादी क्र.१ याने मोजणी अधिका–याने दाखविलेल्या जागेवर लोखंडी अँगलचे कायम स्वरुपी खुणा करुन घेतल्या व त्या आज रोजी कायम आहेत. सदर मोजणी नुसार वादींची जमीन प्रतिवादींकडे निघत नसल्याने वादी क्र.१ हा चिडुन होता व त्याने प्रतिवादी क्र.१ चा हितशत्रु वादी क्र. १ यास चिथावणी दिली व प्रतिवादींसोबत भांडण करु लागला. त्यानंतर वादी क्र. १ याने सन २०१९ मध्ये मो.र.क्र.८९४/१९ अन्वये शेताची पुन्हा मोजणी केली व त्यावेळी मोजणी अधिकारी यांनी सन २०१७–१८ च्या मोजणी नकाशा व खुणा दाखविल्या. त्यावेळी प्रतिवादींनी सन २०१७–१८ च्या मोजणीचा नकाशा दाखवुन पुन्हा खुणा का गाडता असे मोजणी अधिकारी यांना विचारले असता त्यांनी सांगितले की वादी क्र.१ यांनी त्यांची दिशाभुल करुन त्याना मोजणी साठी आणले आहे असे सांगितले. तसेच मोजणी अधिकारी यांनी कोणतीही मोजणी न करता परत निघुन गेले. त्यानंतर वादी क्र.१ व २ यांनी मोजणी अधिका–याशी संगनमत करुन कार्यालयात बसुन खोटा नकाशा तयार केला व सदर खोटा नकाशा आधारे वादी हे तार कंपाऊड करुन प्रतिवादींची जमीन हडप करण्याच्या तयारीत आहेत.

७. प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, वादींनी दाखल केलेले दोन मोजणी नकाशामध्ये तफावत दिसुन येते. जर सन २०१९ च्या मोजणीच्या आधारे वादींना तात्पुरता मनाई हुकूम दिला तर प्रतिवादीचे न भरुन येणारे नुकसान होणार आहे. वादीची सकृतदर्शनी केस नाही शेवटी प्रतिवादींनी वादीचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

८. वादी व प्रतिवादी यांची कथने वाचली. वादीतर्फे **श्री एन. डी. चांदले, वकील** व प्रतिवादींतर्फे **श्री जी. बी. देशमुख, वकील** यांचा युक्तीवाद ऐकला. माझे विचारार्थ खालील मुद्दे येतात व त्यावरील निष्कर्ष मी खालील प्रमाणे कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

अ.क्र.	**मुद्दा**	**निष्कर्ष**
१	यातील वादींनी त्याचे म्हणने सकृत दर्शनी बरोबर असल्याचे सिध्द केले आहे काय?	**नकारार्थी.**
२	न्यायाचा समतोल त्याचे बाजूने असल्याचे वादींनी सिद्ध केले आहे काय?	**नकारार्थी**
३	वादींचे मागणीप्रमाणे तुर्तातूर्त मनाई हुकूम न दिल्यास वादींचे नुकसान होणार आहे काय?	**नकारार्थी**
४.	आदेश कोणता ?	**अंतिम आदेशाप्रमाणे**

:: कारणमीमांसा ::

९. वादींनी त्याच्या कथनाच्या पुष्ठयर्थ खालील कागदपत्रे दाखल केली आहेत.

१. दि.२३/०४/२०१९ रोजी चा सर्वे क्र. ६३ बाबतच्या मोजणी नकाशाची प्रमाणीत प्रत

२. सर्वे क्र.६३/१ चा ७/१२ उता–याची प्रमाणीत प्रत.

३. सर्वे क्र.६३/१ व ६३/१–ब च्या ८–अ उता–याची प्रमाणीत प्रत.

४. सर्वे क्र. ६३/१–ब चा ७/१२ उता–याची प्रमाणीत प्रत.

५. सर्वे क्र.६३/१ व ६३/१–ब च्या ८–अ उता–याची प्रमाणीत प्रत.

६. सर्वे क्र.६३/३–ब चा ७/१२ उता–याची प्रमाणीत प्रत.

७. सर्वे क्र.६३/३–ब च्या ८–अ उता–याची प्रमाणीत प्रत.

८. सर्वे क्र.६३ ची आकार बंद नक्कल.

९. सर्वे क्र.६३ चा मोजणी कार्यालयाचा नकाशाची प्रमाणीत प्रत.

१०. सर्वे क्र.६४/२–अ ते ड च्या चा ७/१२ उता–याच्या प्रमाणीत प्रती.

११. दि.१५/०१/२०१८ रोजी तहसिलदार महागांव यांच्या कडे वादी क्र.१ ने दिलेल्या तक्रार अर्जाची प्रत.

१२. पोलिस स्टेशन, महागांव येथे दिलेल्या तक्रारीची एन.सी.आर. प्रत.

१३. मो.रं.क्र.७६७, दि.२३/०४/२०१९ रोजीच्या मोजणीची 'क' प्रत.

१०. प्रतिवादी यांनी त्यांच्या कथनाच्या पुष्ठयर्थ खालील कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

१. दि.०९/०३/२०१८ रोजीची सर्वे क्र.६३ च्या मोजणी नकाशाची फोटो प्रत.
२. शेत सर्वे क्र. ६३ ची सन २०१८ मधील मोजणी नकाशाची प्रमाणी प्रत.

<u>मुद्दा क्र. १ ते ३ बाबत</u>

११. वरील तिनंही मुद्ये हे एकमेकात गुंतले असल्याने एकत्रीतपणे विवेचन केले आहे. वादीचे असे कथन आहे की, वादग्रस्त सर्वे क्र.६३, ६३/१–ब, ६३/३–अ क्षेत्र ६ हे.१४ आर. जमीन त्यांच्या मालकीची असुन सदर मिळकतीची त्यांनी मोजणी करुन खुणा कायम केल्या आहेत. तसेच सदर मिळकतीच्या पश्चिमेकडील भागामध्ये गुरांसाठी चारा पडीत म्हणुन जमीन ठेवली आहे. प्रतिवादी हे सदर जागेवर व त्यांच्या मिळकतीवर अडथळा करतात म्हणुन वादींनी शासकीय मोजणी नुसार कायमस्वरुपी तार कंपाउंड करण्याचे काम सुरु केले असता प्रतिवादींनी त्यांना हरकत अडथळा केला.

१२. या उलट प्रतिवादींचे असे कथन आहे की, वादीच्या मिळकतीच्या पश्चीम बाजुला त्यांच्या मिळकतीमध्ये त्यांनी वापरासाठी १५ फुटाचा रस्ता निर्माण केलेला असुन वादी यांनी सन २०१७–१८ मध्ये त्यांच्या मिळकतीची

मोजणी करुन खुणा कायम केलेल्या आहेत. मात्र त्यानंतर सन २०१९ मध्ये मोजणी अधिका–याशी संगनमत करुन खोटा नकाशा तयार केला. मात्र मोजणी नकाशा वरुन वादींचा त्यांच्या शेतावर ताबा कुठ पर्यंत आहे हे निष्पन्न होत नाही. वादींनी प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केलेला आहे.

१३. तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज निकाली काढताना वादग्रस्त मिळकत ही प्रथमदर्शनी कोणाच्या ताब्यात आहे हे सिध्द होणे आवश्यक आहे. वादींनी दाव्या सोबत दाखल केलेले सर्वे क्र.६३/१, ६३/१–ब व ६३/३–ब च्या सातबारा उता–यांचे अवलोकन करता सर्वे क्र.६३/१ क्षेत्रफळ १ हे. १ आर तसेच सर्वे क्र.६३/१–ब याचे क्षेत्र १ हे. १७ आर. वादीच्या नावाने मालकी हक्कात नोंद असल्याचे नमुद आहे. तसेच सर्वे क्र.६३/३–अ चे क्षेत्र १ हे. ७८ आर च्या मालकी हक्कामध्ये वादी क्र.२ यांचे नाव नमुद असल्याचे नमुद आहे. मात्र वादीने दाखल केलेले सर्वे क्र.६३ ची आकारबंद नक्कल हिचे अवलोकन करता सर्वे नंबर ६३ चे एकुण क्षेत्रफळ ६ हे. १४ आर. असल्याचे नमुद आहे. वादी क्र.१ व २ यांच्या मालकीचे क्षेत्र सातबारा उता–या प्रमाणे ३ हे. ९६ आर. असल्याचे दिसुन येते. यावरुन सर्वे क्र.६३ मध्ये २ हे. १८ आर. जमीन ही नेमकी कुणाच्या मालकीची आहे या बाबत वादींनी स्पष्टपणे अर्जामध्ये अथवा दाव्यामध्ये काहीही नमुद केलेले नाही.

१४. वादींनी दाखल केलेला दि.२३/०४/२०१९ रोजीचा मोजणी नकाशाचे अवलोकन करता सदर नकाशामध्ये सर्वे क्र.६३ चे क्षेत्रफळ नमुद केलेले नाही. तसेच वादींनी त्यांच्या मालकी व ताब्यातील जमिनीच्या चतुःसीमा सूध्दा दाव्यांमध्ये अथवा अर्जामध्ये नमुद केलेल्या नाहीत. वादीचा दावा पहाता वादीने प्रतिवादी विरुध्द सर्वे क्र.६३ मध्ये हरकत अडथळा करु नये व मोजणी नकाशा प्रमाणे पश्चिम भागात तार कंपाऊंड कामी अडथळा करु नये अशी विनंती केली आहे. तसेच त्याबाबत तात्पुरत्या मनाई हुकुमाची मागणी केली आहे. वादी तर्फे दाखल सर्वे क्र.६४ चे सातबारा उतारे पहाता सदर उता–यांमध्ये मालकी सदरील प्रतिवादी व्यतिरिक्त ईतर लोकांची सुध्दा नावे नमुद आहेत.

१५. वादीने दाखल केलेला मोजणी नकाशा वरुन वादींचे वादग्रस्त मिळकतीवरील ताबा व वहिती नेमकी कोणत्या बाजूने आहे हे सिध्द होत नाही. तसेच वादीने दाखल केलेल्या सातबारा उता–यावरुन वादी हे संपूर्ण सर्वे नंबर ६३ चे ताबेदार असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. वादींच्या तोंडी कथना व्यतिरिक्त सर्वे क्र.६३ मध्ये वादींची नेमकी किती जमीन आहे व कोणत्या बाजुने आहे याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा वादीतर्फे अभिलेखावर दिलेला नाही. त्यामुळे वादीचे दाव्यातील कथन व सातबारा उतारे पाहता वादी हे संपूर्ण सर्वे क्र.६३ चे मालक व ताबेदार असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होत नाही. तसेच

मोजणी नकाशा हा शासकीय दस्त नसल्याने सदर मोजणी नकाशा प्रमाणे वादींस तार कंपाऊंड करण्यासाठी मनाई आदेश देणे योग्य होणार नाही.

१६. या व्यतिरिक्त वादींनी सर्वे क्र.६३ मधील ईतर मालकांची माहिती दाव्यामध्ये लपवुन ठेवली आहे व त्यांच्या मालकी व ताब्यातील क्षेत्राच्या चतुःसीमा व सर्वे क्र.६३ च्या पोटहिश्याची नेमकी स्थिती दिलेल्या नसल्याने वादींचा वादग्रस्त मिळकतीवर प्रथमदर्शनी ताबा आहे हे सिद्ध होत नाही. वरील विवेचन लक्षात घेता वादींनी वादग्रस्त मिळकतीवर त्याचा ताबा असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द केले नाही. तसेच वादींची प्रथमदर्शनी केस असल्याचे सुद्धा वादींनी सिध्द केलेले नाही. म्हणुन मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्र. ४ बाबत</u>

१७. मुद्दा क्र.१ ते ३ चे विवेचन विचारात घेता वादींचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. करीता मी मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

:: **आदेश** ::

१. वादींचा नि.५ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च मूळ दाव्यात समाविष्ट करण्यात यावा.

(संतोष ह. आगे)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
महागांव, जि. यवतमाळ.

दिनांक : १८/०८/२०२१